प्रेस नोट दिनांक :- १३/०३/२०२६

# साकीनाका पोलीस ठाणे गु.र.क्र.१२५/१९९८ कलम ३५३, ३३२, ४२७ भादवि, मधील मागील २७ वर्षापासुन फरार असलेल्या आरोपीतास अटक केलेबाबत.

साकीनाका पोलीस ठाणे गु.र.क्र.१२५/१९९८ कलम ३५३,३३२,४२७ भादवि या गुन्ह्याचे कोर्ट केस क्र.६६००३९८/पीडब्लु/१९९८ मध्ये पाहिजे आरोपी नामे लवु दत्ताराम ठाकुर, वय ५७ वर्षे, रा.ठी. हरीकुंज सोसायटी, रूम नं. ०४, सुभाषनगर, असल्फा गाव, घाटकोपर(पश्चिम), मुंबई याचे विरूध्द मा.प्रथम वर्ग न्याय दंडाधिकरी, ६६ वे न्यायालय, अंधेरी, मुंबई यांनी २७ वर्षापासुन फरार असल्याने आरोपीताविरूध्द जाहीरनामा वॉरंट जारी केले होते.

त्याअनुषंगाने साकीनाका पोलीस ठाणेचे पाहिजे/फरार आरोपी शोध पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी वर नमुद गुन्ह्यातील आरोपीताच्या राहत्या पत्त्यावर वांरवार शोध घेतला असता, सदर आरोपी मिळुन आला नाही. नमुद गुन्ह्यातील आरोपीची गुप्त बातमीदारामार्फतीने शोध घेतला असता, नमुद आरोपी हा त्याची ओळख लपवुन फ्लॅट नं. सी/०५, एम व्ही पॅराडाईज, परमात्मा पार्क जवळ, तांदुळ बाजार समोर, चंदनसार रोड, विरार(पुर्व), ता.वसई, जिल्हा पालघर या पत्त्यावर रहावयास आहे. अशी गुप्त माहिती प्राप्त करण्यात आली.

दिनांक १२/०३/२०२६ रोजी साकीनाका पोलीस ठाणेतील फरार/पाहिजे पथकाकडुन गुन्ह्यातील आरोपीतास पकडण्यासाठी त्याचे वर नमुद नवीन पत्त्यावर सापळा रचला असता, सदर जाहीरनामा वॉरंट मधील आरोपी नामे लवु दत्ताराम ठाकुर, वय ५७ वर्षे, हा मिळुन आल्याने त्यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

तरी वर नमुद आरोपीत इसम हा नमुद गुन्ह्यात मागील २७ वर्षापासुन फरार/पाहिजे आरोपी असुन त्यास नमुद गुन्ह्यात अटक करून तसेच गुन्हा उघडकीस आणण्याची उल्लेखनीय कामगिरी साकीनाका पोलीस ठाणेचे फरार/पाहिजे पथकातील अंमलदार यांनी पार पाडली आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बुहन्मुंबई श्री. देवेन भारती सो, मा. पोलीस सह आयुक्त (का.व सु.), बुहन्मुंबई श्री. सत्यनारायण, मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, श्री. परमजित सिंह दहिया, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१०, मुंबई श्री. दत्ता नलावडे, सहायक पोलीस आयुक्त साकीनाका विभाग , श्री. प्रदिप मैराळे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल यादव, याच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली पोहक्र. ९७०४९६/सांडव, पोहक्र. १०५५/ होळकर यांनी पार पाडली आहे.